खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२–२३

### आंतरविभागीय सायकल स्पर्धा

केसरी राष्ट्रीय ठेवा



## आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धा



राजगुरूनगर, (वार्ताहर) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धेचे आयोजन शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे करण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र मानवाधिकार महिला सेलच्या कार्यकारी अध्यक्षा राजमाला बुट्टेपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. दीपक माने, क्रीडा मंडळ प्रतिनिधी शिवाजी उत्तेकर, महाराष्ट्र राज्य सायकलिंग प्रशिक्षक दिपाली निकम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय सातपुते, दिपाली शिलदनकर,, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा व्ही.बी दौंडकर उपस्थित होते.

या स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर आणि नाशिक अशा चारही विभागातून आलेल्या सायकलिंग खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतून निवडला जाणारा संघ हा जानेवारी २०२३ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धा

**राजगुरूनगर (दै. संध्या) :**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धेचे आयोजन शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र मानवाधिकार महिला सेलच्या कार्यकारी अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ.दीपक माने, क्रीडा मंडळ प्रतिनिधी शिवाजी उत्तेकर, महाराष्ट्र राज्य सायकलिंग प्रशिक्षक दिपाली निकम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय सातपुते, दिपाली शिलदनकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा व्ही.बी दौंडकर उपस्थित होते. या स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर आणि नाशिक अशा चारही विभागातून आलेल्या सायकलिंग खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतून निवडला जाणारा संघ हा जानेवारी २०२३ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शारीरिक शिक्षण संचालक प्रा.प्रतिमा लोणारी यांनी परिश्रम घेतले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**